**<u>विषय:- मंडळाचे आर्थीक वर्ष २०२६-२७ या वर्षीचे अर्थसंकल्पाच्या प्रति तयार करणे बाबत</u>.**

# म. प्र. नि. मंडळामार्फत पुरवठाधारक यांच्याकडुन सीलबंद/ मोहरबंद दरपत्रक मागविणेबाबत.......

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आर्थिक वर्ष २०२६-२७ या वर्षीचा अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे. सदर अर्थसंकल्प मंडळाच्या १८७ व्या बैठकीमध्ये दि. १८.०८.२०२६५ रोजी मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. मंडळाच्या उपरोक्त बैठकीमध्ये अर्थसंकल्पास मंजुरी मिळालेली आहे.

वित्तीय वर्ष २०२६ - २७ या वर्षीचा मंडळाचा खर्च मंजूर अर्थसंकल्पानुसार होणे आवश्यक आहे. विभागीय कार्यालयांना कार्यालयासाठी मंजूर अर्थसंकल्पाच्या एकूण ५५ प्रति तयार करून त्या संबंधित कार्यालयांना वाटप करणे आवश्यक आहे. त्यासाठी सीलबंद / मोहरबंद दरपत्रक दि. २३/१०/२०२६ ते ३०/१०/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. भांडारशाखा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉइंट , 4 था मजला, शिव (पूर्व), मुंबई – ४०००२२ येथे देण्यात यावीत.

अर्थसंकल्प पुस्तक तयार करण्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

| **अनु. क्र.** | **छपाईचा तपशील** | **एकूण नग संख्या** |
|---|---|---|
| ०1 | A4 ८० GSM White पेपर साईजच्या आकाराची पुस्तके<br>५५ पानांचे ०१ पुस्तक<br>३०० GSM Matecard मुखपृष्ठ रंगीत चार कलर आणि बुक बाइंडिंग | ५५ |

**<u>खालील अटी व शर्ती सह ....</u>**

1. पुरवठाधारक हा राज्यातील असावा व तो नोंदणीकृत असावा.
2. शासनाचे शॉप ॲक्ट नुसार वैध दुकाने नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक आहे.
3. पुरवठाधारक हे साहित्याचे उत्पादक कंपनी असल्यास अथवा पुरवठादार /वितरक असल्यास उदयोग आधार जोडणे बंधनकारक राहील.
4. पुरवठाधारक यांनी GST नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड क्रमांक / कंपनीचे अधिकृत पॅन कार्ड सोबत जोडणे आवश्यक आहे.
5. साहित्य पुरविताना वाहतूकीत साहित्याची काही तुटफुट झाल्यास नुकसानीची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची राहील

6. पुरवठादाराने सादर केलेले दर सर्व करासह असणे आवश्यक आहे.

7. नामंजूर करण्यात आलेल्या दरपत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार किंवा स्पष्टीकरण स्वीकाराले जाणार नाही.

8. पुरवठाधारकाने सादर केलेली कागदपत्रे बनावट / चुकीची आढळल्यास अशा पुरवठादाराची दरपत्रके विचारात घेतली जााणार नाही व त्याच्याविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा पुरवठादाराला भविष्यात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विभागाच्या कोणत्या ही खरेदी प्रक्रिया मध्ये सहभाग घेता येणार नाही.

9. कोणतेही कारण न देता दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार मंडळाचे सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर राखून ठेवण्यात येतील.

10. सदोष व निष्कृष्ट दर्जाच्या साहित्याचा नमुना आढळुन आल्यास तो तत्काळ बदलून देणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील. तसे न केल्यास पुरवठाधारकाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येऊन सदर साहित्याची रक्कम पुरवठाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

Digitally signed by
Pramod Dharma Nandgaonkar
Date: 21-10-2026 18:44:02

प्रशासकीय अधिकारी
म प्र नि मंडळ